हिंगोली जिल्हा पोलिस वार्तापत्र

दिनांक 09/10/2019

**दारूबंदी सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :–**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध दारू विक्रीयाविरूध्द जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशन अंतर्गत विशेष मोहिम राबविली जात असुन या मोहिमे अंतर्गत दिनांक 08/10/2019 रोजी जुगार कायद्या अंतर्गत पो.स्टे.बासंबा,औंढा हिंगोली शहर, वसमत शहर येथे (05) ठिकाणी छापा मारून आरोपी यांच्या विरूध्द कार्यवाही करून त्यांचेकडून एकुण 44956/– रु. व 73.98 लीटर दारू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन,आरोपीतां विरूध्द दारूबंदी कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहेत.

**जुगार सदराखाली विशेष मोहिम अंतर्गत कार्यवाही :–**

मा.पोलीस अधीक्षक हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली हिंगोली जिल्हयामध्ये अवैध जुगारविरूध्द जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशन अंतर्गत विशेष मोहिम राबविली जात असुन या मोहिमे अंतर्गत दिनांक 08/10/2019 रोजी जुगार कायद्या अंतर्गत पो.स्टे. कुरुंदा, नर्सी नामदेव येथे (02) ठिकाणी छापा मारून आरोपीतांच्या विरूध्द कार्यवाही करून त्यांचेकडून एकुण 51720/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन,आरोपीतां विरूध्द जुगार कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येवुन पुढील तपास करण्यात येत आहेत.

**सार्वजनिक शांतता भंग करणा–या आरोपी विरूध्द कार्यवाही :–**

दिनांक 08/10/2019 रोजी फिर्यादी प्रेमदास परसराम चव्हाण वय 43 वर्ष नौकरी पोह/60 ने पोस्टे वसमत शहर यांच्या फिर्यादीवरून पोस्टे वसमत शहर येथे 379/19 कलम 160 भादवी प्रमाणे आरोपीतांनी दुकान लावण्याचे कारणावरून आपसात झुंज करून एकमेकांना शिवीगाळ करून जोरजोराने आरडाओरड करून शांतता भंग होईल असे कृत्य करीत असतांना मिळून आलेल्या संदर्भात पोलीस तपास करीत आहेत.

**गौण खनिज अधिनियमाप्रमाणे गुन्हा दाखल :–**

दिनांक 08/10/2019 रोजी फिर्यादी शंकर दत्तराव जाधव वय 50 वर्ष नौकरी पोह/515 ने स्थागुशा हिंगोली यांच्या फिर्यादीवरून पोस्टे बासंबा येथे 193/2019 कलम 379,34 भादवी सह कलम 21(1),48(7)(8) गौण खनिज अधिनियम प्रमाणे आरोपींनी संगनमत करून गौण खनिज रेतीची स्वताच्या फायद्यासाठी विक्री करण्याचे उद्देशाने चोरटी वाहतुक करीत असतांना आरोपी 1 हा वरील मुद्देमालासह मिळून आला या संदर्भात पोलीस तपास करीत आहेत.

दिनांक 08/10/2019 रोजी फिर्यादी शिवलाल सुर्यकांत येवारे वय 34 वर्ष नौकरी पोलमाने ने स्थागुशा हिंगोली यांच्या फिर्यादीवरून पोस्टे बासंबा येथे 192/2019 कलम 379,34 भादवी सह कलम 21(1),48(7)(8) गौण खनिज अधिनियम प्रमाणे आरोपींनी संगनमत करून गौण खनिज रेतीची स्वताच्या फायद्यासाठी विक्री करण्याचे उद्देशाने चोरटी वाहतुक करीत असतांना वरील मुद्देमालासह मिळून आला या संदर्भात पोलीस तपास करीत आहेत.

**दुखापत :–**

दिनांक 08/10/2019 रोजी फिर्यादी सौ उज्वला राहुल खांडरे वय 35 वर्ष घरकाम जात बौध्द रा आसेगाव पेन ता जि वाशिम यांच्या फिर्यादीवरून पोस्टे गोरेगाव येथे 194/2019 कलम 143,447,504,506,34 भादवी प्रमाणे आरोपीतांनी गैरकायद्याची मंडळी जमवुन संगनमत करून शेतामध्ये अनाधिकृत रित्या प्रवेश करून फिर्यादीस शेतातील सोयाबीन काढण्याचे कारणावरून शिवीगाळ करून तुम्ही या शेतातुन निघुन जा नाहीतर तुम्हाला खतमच करतो अशी जिवे मारण्याची धमकी दिली म्हणुन गुन्हा या संदर्भात गोरेगाव पोलीस तपास करीत आहेत.

दिनांक 08/10/2019 रोजी फिर्यादी गोपाल बाबुराव क–हाळे वय 19 वर्ष मजुरी जात मराठा रा डिग्रस क–हाळे ता जि हिंगोली यांच्या फिर्यादीवरून पोस्टे हिंगोली शहर येथे 587/2019 कलम 325,323,504,34 भादवी प्रमाणे आरोपीतांनी संगनमत करून फिर्यादीस आरोपी याने तुझ्या गावात आलो असता मि एक मुलाला मारत होतो तेव्हा तु का सोडवा सोडव केलीस या कारणावरून यातील आरोपीने फिर्यादीस लोखंडी रॉडने उजव्या हातावर मारून फॅक्चर केले व मानावर पाठीवर मारून जखमी करून थापडाबुक्याने मारहाण करून फिर्यादीचा मित्र यास पण शिवीगाळ करून थापडाबुक्यानी मारहाण केली म्हणुन गुन्हा या संदर्भात हिंगोली शहर पोलीस तपास करीत आहेत.

दिनांक 08/10/2019 रोजी फिर्यादी सौ आलम्माबाई सिध्दार्थ मदाडे वय 40 वर्ष शेती मजुरी जात बौध्द रा निंमखेड ता जि हिंगोली यांच्या फिर्यादीवरून पोस्टे बासंबा येथे 190/2019 कलम 324,448,323,504,506,34 भादवी प्रमाणे आरोपीतांनी संगनमत करून फिर्यादीचे घरासमोर अंगणात जावुन फिर्यादीस तुझ्या नवाची पाणी आमचे घरासमोर का आले असे म्हणुन आरोपी 01 याने केस धरून खाली पाडले आरोपी 02 याने काठीने फिर्यादीचे हातावर मानावर पाठीवर मारहाण करून मुक्कामार दिला आरोपी 03 याने लाथाने पोटात मारहाण केली शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली म्हणुन गुन्हा या संदर्भात बासंबा पोलीस तपास करीत आहेत.

**चोरी :–** दिनांक 08/10/2019 रोजी फिर्यादी संदिप अशोक कुरवाडे वय 28 वर्ष शेती जात धनगर रा नर्सी अवाडी बासंबा ता जि हिंगोली यांच्या फिर्यादीवरून पोस्टे बासंबा येथे कलम 457,380,511,34 भादवी प्रमाणे अज्ञात आरोपींनी संगनमत करून फिर्यादीच्या घराचा दरवाजा कोणकामळ उघडुन आत प्रवेश करून घरातील लोखंडी कपाटाचा दरवाजा उघडुन आत ठेवलेला वरील वर्णनाचे सोन्या व चांदीचे दागीने किंमत 1,07,100 रु चा मुद्देमाल चोरून नेलाया संदर्भात बासंबा पोलीस तपास करीत आहेत.

पोलीस अधिक्षक हिंगोली

करीता